International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.1 September – October 2023

# राजर्षी शाहू छत्रपती: बहुजन समावेशनाचे राजकारण

**डॉ. सचिन दत्तात्रय भोसले**

**कोल्हापूर**

*Corresponding Author - डॉ. सचिन दत्तात्रय भोसले*

**DOI - 10.5281/zenodo.14233250**

**प्रस्तावना:**

राजर्षी शाहू महाराज यांचे स्थान महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात अव्वल दर्जाचे आहे महाराष्ट्र राज्यातील बहुसंख्यांक समाज हा दीर्घ काळापासून शिक्षण राजकीय सत्ता सामाजिक न्याय व प्रतिष्ठा यापासून वंचित व उपेक्षित राहिला त्याबाबतची सामाजिक जागृती करण्याचं कार्य महात्मा फुले यांनी केले त्यानंतर या समाजाचे परिवर्तन घडवून आणण्याच्या कार्यात महत्त्वाचा सहभाग महर्षी विठ्ठल रामजी शिंदे राजर्षी शाहू महाराज यापैकी राजर्षी शाहू महाराज हे करवीर संस्थानचे छत्रपती होते आपल्या राज्यसत्तेचा उपयोग त्यांनी वंचित अशा समाजात जागृती निर्माण करण्यासाठी केला यामुळे सामान्य जनतेच्या मनात आत्मभान जागृत झाले. राजर्षींच्या या महान कार्यामुळेच मराठी समाज हा त्यातल्या त्यात या देशातला आधुनिक समाज बनला आहे पुढे जाऊन ज्या समाजाचे संस्थात्मक जीवन भरभक्कम असते तोच समाज पराक्रम गाजवू शकतो हे राजर्षी शाहू महाराजांनी अचूकपणे जाणले होते व याबाबत त्यांची दृष्टी शास्त्रशुद्ध आणि आधुनिक होती.

**राजर्षी शाहू महाराजांचे राजकीय विचार:**

राजर्षी शाहू महाराजांना त्यांच्या कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेच्या अंमलबजावणीसाठी नवा मार्ग तयार करावा लागला. उदारमतवादी राजकीय, सामजिक, धार्मिक विचारांच्या मुशीतून राजर्षींचे उदारमतवादी व्यक्तित्व कसे घडत गेले हे लक्षात येते कोल्हापूरच्या संस्थानामध्ये भूतकाळातील करार आणि प्रतिबद्धता यांनी लादलेल्या काही मर्यादा अंतर्गत काम करावे लागले. त्यांना राज्याचा अंतर्गत कारभार चालवायचा होता आणि राज्याचे बाह्य व्यवहार, सर्व व्यावहारिक हेतूने, ब्रिटिश सरकारच्या ताब्यात राहायचे. राजाने ब्रिटीश सरकारच्या सूचनांचे पालन करावे आणि भारताच्या राणी सम्राज्ञीशी निष्ठा ठेवावी. शिवाय अल्पसंख्याक राजवटीखालील रिजन्सी कौन्सिलच्या प्रदीर्घ कालावधीमुळे राज्याची प्रतिष्ठा कमी झाली होती, ज्याचा परिणाम म्हणून सरंजामदार सरदारांनी अवाजवी फायदा उठवला होता आणि त्यांच्या मालकाच्या म्हणजेच राजाच्या पदाला हानी पोहोचवण्याच्या महत्त्वाकांक्षा वाढवल्या होत्या. शेवटी, ज्या नोकरशाहीवर राज्याची इमारत उभी

होती, ती जवळजवळ संपूर्णपणे कोल्हापुरात बाहेरून आयात केलेल्या ब्रिटीश, पारशी आणि ब्राह्मणांच्या नियंत्रणाखाली होती. स्थानिक लोकांचा, विशेषतः मराठा आणि इतर समाजाचा प्रशासनात कोणताही वाटा नव्हता. राजर्षी शाहू महाराजांना त्यांचे कल्याणकारी राज्याच्या ध्येय साध्य करण्यासाठी संघर्ष करावा लागला.

२ एप्रिल १८९४ रोजी त्यांनी कोल्हापूरच्या गादीवर आरूढ झाल्यानंतर लगेचच जारी केलेल्या पहिल्या घोषणेमध्ये लोकांच्या कल्याणाची आणि आनंदाची त्यांची संकल्पना मोठ्या प्रमाणावर दिसून आली होती. ती म्हणजे "कोल्हापूर राज्यातील आमच्या सर्व प्रजाजनांना हे माहित असावे की आमच्या अल्पसंख्याक राजवटीत राज्याचा कारभार चालवणाऱ्या प्रशासकीय परिषदेची कार्ये संपुष्टात आली आहेत आणि आजपासून आम्ही आमच्या राज्याच्या पूर्ण अधिकारांमध्ये प्रवेश केला आहे. म्हणजे २ एप्रिल १८९४" "आमची प्रजा सदैव सुखी आणि समाधानी असावी, त्यांचे कल्याण दिवसेंदिवस वाढत जावे आणि आपले राज्य सर्व बाबतीत समृद्ध व्हावे ही आमची मनापासून इच्छा आहे. या वस्तुचा प्रचार करताना आम्ही अत्यंत निष्ठावान आणि मनापासून विसंबून असतो. ते आमचे जहागीरदार, नातेवाईक, सरदार, मानकरी, इनामदार, कामदार, सर्व श्रेणीतील व्यापारी वर्ग आणि इतर सर्व विषयांचे सहकार्य. या प्रस्तावित कार्यात शाहू आणि ब्रिटीश सरकारच्या सामाजिक आणि राजकीय धोरणांचा अंतर्भाव असलेल्या मुख्य प्रवाहांचे विश्लेषण केले आहे. त्याचप्रमाणे भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस आणि गुप्त संघटनांच्या झेंड्याखाली स्वातंत्र्य चळवळीबद्दल शाहूंचा दृष्टिकोन स्पष्ट केला आहे.

**राजर्षी शाहूंची स्वराज्य संकल्पना**:

राजर्षी शाहू छत्रपती यांना गुलामगिरी नष्ट करायची होती .गुलामगिरी दोन प्रकारची होती पहिली होती सामाजिक गुलामगिरी ती स्वकीयांनी स्वकीवर लादलेली दुसरी होती ती म्हणजे राजकीय गुलामगिरी ती परकीय आणि स्वकीयावर लादलेली प्रथम स्वंकियांनी लादलेली गुलामगिरी नष्ट करून सामाजिक स्वातंत्र्य निर्माण करू या असा शाहू महाराजांचा आग्रह होता स्वराज्य म्हणजे लोकसत्ताक राज्यांमध्ये स्वाभिमान निर्माण करणे त्याचबरोबर स्वराज्यामध्ये राजकीय हक्काबरोबरच सामाजिक हक्काची प्राप्ती झाली पाहिजे स्वराज्याच्या हक्काच्या प्राप्तीपूर्वी सामाजिक हक्क प्राप्त झाले पाहिजेत अशी भूमिका राजर्षी शाहू महाराजांची असलेली दिसून येते राजर्षी शाहूंनी आपल्या भाषणातून अनेक ठिकाणी स्वराज्य या विषयावर आपले परखड विचार व्यक्त केले आहेत त्यांच्या मते प्रथम स्वराज्याचा हक्क उभोगण्याची लायकी बहुजन समाजाच्या ठिकाणी उत्पन्न झाली पाहिजे. त्यासाठी समाजातील जातीभेद नष्ट होऊन कनिष्ठ जातीचा दर्जा उंचावला पाहिजे तसेच त्यांना किमान प्राथमिक शिक्षण तरी मिळावस हवे आपली प्रजा किमान तिसरी इयत्ता शिकून तयार झाली तरी आपण तिला स्वराज्याचे हक्क आनंदाने देऊ असे त्यांनी एका ठिकाणी म्हटले आहे माझ्या रयतेमध्ये

प्राथमिक व उच्च शिक्षणाचा प्रसार करण्याची माझी इतकी जोराने खटाटोप चालली आहे यावरून शक्य तितक्या लवकर रयतेसं स्वराज्य देण्याचं माझं धोरण आहे हे आपल्या ध्यानी येईलच माझी सर्व प्रजा मराठी तिसरी इयत्ता तरी शिकून तयार झाली असती तर त्यांना राजकारभाराचे हक्क आनंदाने देऊन मी आजच विश्रांती घेतली असती आज राजकारभाराचे सर्व काम मलाच करावे लागत आहे प्रजेवर फक्त कर देण्याची जबाबदारी आहे पुढे कर देणे व योग्य तो खर्च करणे ही जबाबदारी रयतेवर पडेल पण माझी प्रजा ही जबाबदारी घेण्याअगोदर पूर्णपणे नसली तरी अंशता तरी पात्र झाली पाहिजे म्हणजे रयतेतील थोडासा भाग पूर्ण सुशिक्षित होण्यापेक्षा सर्व रयतेला प्राथमिक शिक्षणाचा थोडा तरी अंश मिळाला पाहिजे असे माझे मत आहे रयतेतील मोठा भाग अडाणी राहिला थोडेसे लोक विद्यासंपन्न झाले व प्रजेस अधिकार दिले तर या थोड्या लोकांच्या हाती पडणार व एक स्वदेशी बीरोक्रसी तयार होणार या सुशिक्षित बीरोक्रसी कारभार आमच्या ओळखीचा आहे. महाराजांच्या वरील विधानावरून स्वराज्य विषयीची संकल्पना स्पष्ट होते महाराजांचा स्वराज्याला मुळीच विरोध नव्हता फक्त त्यासाठी लोकांना किमान प्राथमिक शिक्षण देऊन थोडी तरी प्रशिक्षित करावयास हवे असे त्यांना वाटत होते. स्वराज्याचा हक्क कळल्याशिवाय स्वराज्य मिळणे म्हणजे त्या हक्काचा फायदा मुठभर सुशिक्षितांना घेणे असा अर्थ होतो .

**वेदोक्तचा सामाजिक न्याय :**

वेदोक्त म्हणजे काय हिंदू धर्मातील १६संस्कार व इतर धर्मकृत्ये वैदिक मंत्रांनी करण्याचा अधिकार म्हणजे वेदोक्त असा समाजात अर्थ घेतला आहे प्राचीन काळी ब्राह्मण क्षत्रिय वैश्य वर्णांना तो अधिकार होता कालंतरणे रोगामध्ये ब्राह्मणांनी आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी क्षत्रिय वैश्य या दोन्ही वर्णनाचे संस्कारलोप झाल्याचे सांगून त्यांना शूद्र वर्णात ढकलले जगात आता फक्त ब्राह्मण आणि शूद्र असे दोनच वर्ण असल्याचे सांगितले गेले. शुद्राची धर्मकृत्येतर चाललीच पाहिजेत कारण ती तर ब्राह्मणाची खरी अर्थसंपत्ती होती यासाठी शुद्राकरिता पुराणोक्त मंत्राची उपाययोजना केली गेली वेदातील मंत्र प्रथम दर्जाचे ते ब्राह्मणासाठी व पुराणातील मंत्र दुय्यम दर्जाचे ते शूद्रांसाठी असा एकंदरीत अर्थ घेतला जातो १८९९ रोजी वेदोक्त प्रकरण घडले यामध्ये शाहू महाराज नेहमीप्रमाणे कार्तिक मासात नित्यनियमाने पहाटे पंचगंगा स्नान जात असत यावेळी एके दिवशी या मंडळीत महाराजांचे स्नेही पंडित राजाराम शास्त्री भागवत होते स्नान चालू असता नारायण भडजी मंत्र म्हणत होते राजाराम शास्त्री यांनी भटजींच्या मंत्राकडे लक्ष गेले आणि भडजी हे वेदोक्त मंत्रा ऐवजी पुराणूक्त मंत्र उच्चारत होते हे छत्रपती च्या नजरेस आणून दिल्यानंतर त्याच त्यांनी जाब विचारला त्यावर त्यांनी उत्तर दिले की शुद्राकरिता पुराणोक्त मंत्र सांगावे लागतात भटजींनी ही भाषा केल्यानंतर महाराजांना ही कल्पना सहन झाली नाही आणि ते चिंतनशील बनले आणि

सामाजिक बंडखोरीस उद्युक्त झाले यातून असा प्रत्यय आला की वेदोक्त मंत्राचा प्रश्न हा नव्हता हा सामाजिक हक्काचा प्रश्न होता हिंदू धर्मातील क्षत्रिय वर्णाचा एक मूलभूत हक्क म्हणून मराठ्यांना वेदोकाचा अधिकार हवा होता तेव्हा मराठ्याच्या वतीने हा संघर्ष सामाजिक हक्काच्या सामाजिक न्यायाचा न्यायाच्या प्रस्तापनेसाठी होता शाहू महाराजांच्या जीवनातील एक महत्त्वाचा हा पहिला टप्पा होता हे लक्षात घेतले पाहिजे १९१० नंतरच्या दशकात सर्वांकष लढा उभारून ब्राह्मण वर्गाच्या मक्तेदारी विरुद्ध लढणाऱ्या सत्यशोधक समाजाकडे महाराजांची जवळीकता निर्माण झाली

**आर्य समाज आणि सत्यशोधक समाज**:

१९व्या शतकाच्या उत्तरार्धात आर्य समाजाने सत्यशोधक समाज यासारख्या संघटना उदयास आले हिंदू समाजातील ब्राह्मणी वर्चस्वा विरोधात आणि धार्मिक व सामाजिक समता प्रस्थापित करणे हे त्यांचे प्रमुख उद्दिष्ट असल्यामुळे राजश्री शाहू महाराजांना त्याविषयी विशेष आस्था होती १९०२ राजर्षी शाहू महाराजांचा आर्य समाजाशी परिचय झाला त्यावेळी वेदोक्त प्रकरण घडले होते. महाराष्ट्रातील सनातनी ब्राह्मण वर्गाने महाराजांना शूद्र ठरवून त्यांना वेदोक्तचा अधिकार नाकारलेला होता या पार्श्वभूमीवर हिंदू धर्मातील सर्वांना अगदी स्त्री शूद्रातिशूद्र ना सुद्धा वेदाचा अधिकार देणाऱ्या आर्य समाजाविषयी महाराजांना जवळीकता वाटली ब्राह्मण ब्यीरोकरसीविरुद्ध दमदार पावले उचलायला सुरुवात केली तेव्हा त्यांनी आर्य समाजाचा उघडपणे पुरस्कार केला १९१६-१७ या कालावधीमध्ये आर्य समाजाची तत्वे मनुष्याची मनुष्याची समानता शिकवतात आणि ब्राह्मणाची धार्मिक मक्तेदारी नाकारतात शाहू महाराजांच्या उदार आश्रयाखाली १९१८ मध्ये कोल्हापुरात आर्य समाजाची स्थापना झाली.

वेदोक्त प्रकरण च्या संघर्षामुळे कोल्हापूर संस्थान मध्ये सत्यशोधक चळवळीच्या पुनर्जीवनास विलक्षण अनुकूल वातावरण तयार झाले परिणामी ११जानेवारी १९११ रोजी कोल्हापुरात सत्यशोधक विचाराच्या मंडळींनी एकत्र येऊन सत्यशोधक समाजाची स्थापना केली शाहू महाराजांचीच प्रेरणा त्यामागे असल्यामुळे श्री शाहू सत्यशोधक समाज असे त्याला नाव देण्यात आले. यामध्ये कोल्हापुरात १९१२ मध्ये २००,१९१३ मध्ये २६६ तर १९१४ मध्ये २९९ लग्नविधी सत्यशोधक पद्धतीने पार पाडले त्याचबरोबर धार्मिक विधींची संख्या वेगळीच होती त्याचबरोबर पुरोहिताकडून आपले धार्मिक विधी करण्याची लाट कोल्हापुरात उत्पन्न होऊन ती संस्थानातील खेड्यापाड्यात पसरू लागली त्यातून मराठा पुरोहितांना प्रशिक्षण देण्याची कल्पना पुढे आली आणि भास्करराव जाधवांच्या मार्गदर्शनाखाली जुलै १९१३ मध्ये कोल्हापुरात सत्यशोधक शाळा स्थापन केली गेली अर्थात या सर्व प्रयत्नामागे महाराजांचा आशीर्वाद होताच राजर्षींनचा दुसरा मोठा निर्णय म्हणजे मराठा पुरोहित तयार करण्यासाठी खास प्रशिक्षण शाळा स्थापन करण्याचा सहा जुलै १९२० रोजी शिवाजी क्षत्रिय वैदिक पाठशाळा वैदिक स्कूल या नावाची वैदिक शिक्षण देणारी संस्था मामासाहेब खानविलकर

यांच्या अध्यक्षतेखाली अस्तित्वात आली सुरुवातीला १४ विद्यार्थी होते शेवटी त्याची संख्या ६२ वर गेली

**राजर्षी शाहू शिक्षणविषयक विचार :**

शाहू महाराजांनी ज्यांना समाजात शिक्षणाचा हक्क नाकारला होता, अशा सर्वसमान्य खेड्यापाड्यात पसरलेला बहुजन समाज साक्षर होणे. त्यांना ज्ञानाची गोडी लागणे आवश्यक आहे. हे ओळखून महाराजांनी आपल्या राज्यात सक्तीच्या शिक्षणाचा कायदा लागू केला

**सक्तीचे मोफत शिक्षण :**

राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थाना मध्ये १९१७ साली सक्तीच्या शिक्षणाचा कायदा केला. राखीव जागांसंबंधी १९०२ साली केलेला कायदा जसा तेव्हा दुर्मीळ; तसाच सक्तीचा होता; तसेच मोफत शिक्षणाचा १९१७ सालचा शाहू महाराजांचा कायदाही दुर्मीळच होता. शाहू महाराजांचा भर प्राथमिक शिक्षणावर होता. त्यांची प्राथमिक शिक्षणासंबंधीची तळमळ एका भाषणातून व्यक्त झाली आहे. ते म्हणाले होते, “शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे, असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही, असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये कधीही निपजणार नाहीत. म्हणूनच सक्तीच्या आणि मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे. शिक्षणातील अडचणींचे पेशवाईतील उदाहरण देताना शाहू महाराजांनी सांगितले की, "श्री प्रतापसिंह महाराज छत्रपती (सातारा) हे पेशव्यांच्या ताब्यात असताना, लहानपणी लिहिण्यावाचण्याची आणि शिकण्याचीही त्यांना बंदी होती. तेव्हा त्यांच्या पूज्य व धोरणी आईने त्यास रात्री बारा वाजता उठवून ब्राह्मणेतर पंतोजीकडून लिहायला, वाचायला शिकविण्याचे काम केले." पेशवाईत खुद्द छत्रपतींना चोरून मध्यरात्री शिक्षण घ्यावे लागत होते; मग इतरांची काय कथा ! शिक्षणासंबंधी अशा परंपरा असताना, महाराजांनी शिक्षणास महत्त्व दिले, हे लक्षात ठेवले पाहिजे. 'No cake to a few untill all are served with bread', हे इंग्लंडातील मजूर पक्षाचे धोरण आहे; पण येथे शेकडा ९० लोक उपाशी आहेत व १० लोक पोळी खात आहेत. उपाशी लोकांसाठी कोंड्याच्या भाकरीची सोय करण्याअगोदर या दहा जणांच्या पोळीवर साजूक तूप वाढा, असा ओरडा करणाऱ्यांना रयतेची कळकळ कितपत आहे, हे उघड आहे. सक्तीच्या शिक्षणाचा कायदा करताना, महाराजांनी पालकांना दंड ठेवला. यादी करून ती जाहीर करून, नोटीस पाठवूनही मुलगा शाळेत आला नाही, तर दरमहा १ रु. चा दंड मुलगा शाळेत येईपर्यंत केला जाईल, असा कायदा होता. १९२० च्या सुमारास काही ब्राह्मण पुढारी आय. सी. एस.ची परीक्षा भारतात व्हावी म्हणून प्रयत्न करीत होते. तेव्हा ही परीक्षा इंग्लंडमध्ये होत असे. त्यांच्या या प्रयत्नासंबंधी महाराज म्हणतात, "आय. सी. एस. च्या खटपटीला आणि कॉलेज स्थापन करायला भरपूर पैसा मिळतो; पण प्राथमिक शिक्षणास मात्र

या लोकांजवळ पैसा नाही. का? त्याच्यायोगे ब्राह्मणेतरास फायदा झाला असता, हेच त्यातील इंगीत होय." कोल्हापुरात उच्चशिक्षणाच्याही सोयीची दखल महाराजांनी घेतली होती. हायस्कूल व कॉलेजही काढले होते. परंतु, भर प्राथमिक शिक्षणावर होता.

**दलितांना शिक्षण:**

शाहू महाराजांनी प्राथमिक शिक्षणाप्रमाणेच मागासलेल्या जातींच्या आणि मागासलेल्या वर्गाच्या शिक्षणाची खास काळजी घेतलेली दिसते. परंपरेचे गुलाम बनलेले संस्थानातील काही शिक्षक महारा-मांगाच्या मुलांना शाळेच्या व्हरांड्यात बसवीत व इतर मुलांना आत बसवीत आणि मग शिक्षण देत. महाराजांच्या हे लक्षात आल्यानंतर अशा शिक्षकांना जरब बसेल, असा हुकूम महाराजांनी काढला. ८-१०-१९१९ रोजी शाहू महाराजांनी खास हुकूम काढला. त्यात म्हटले आहे, "करवीर इलाख्यात अस्पृश्य लोकांच्या मुलांसाठी स्वतंत्र शाळा असता, त्या येत्या दसऱ्यापासून बंद कराव्यात व अस्पृश्यांच्या मुलांस सरकारी शाळांत इतर मुलांप्रमाणेच दाखल करून घेत जावे. सरकारी शाळांतून शिवाशिव पाळण्याची नसल्याने सर्व जातींच्या व धर्मांच्या मुलांस एकत्र बसविण्यात यावे." त्यांनी स्पृश्यवर्गापिक्षा अस्पृश्यांना जास्त ममतेने व आदराने वागवावे; कारण स्पृश्य लोक कोणत्याही प्रकारे शिक्षणात आपला मार्ग काढू शकतात. परंतु, अस्पृश्यांना ते असाध्य असल्यामुळे कोणताही मार्ग नाही. शाळाखात्यातील कोणाही इसमाची असे करण्यास हरकत असेल, तर त्याने हा हुकूम झाल्यापासून सहा आठवड्यांच्या आत आपला राजीनाम पाठवावा. अर्थात, त्याला पेन्शन मिळणार नाही. मदत मिळणाऱ्या शिक्षणसंस्थेची हरकत असेल, तर त्या बंद केल्या जातील असा महत्वपूर्ण आदेश महाराजांनी काढला.

**शैक्षणिक सवलती:**

दलित समाजातील मुलांना संस्थानात प्रोत्साहनपर आणि आवश्यक म्हणून स्कॉलरशिप्स दिल्या जात व सवलती मिळत. राजाराम कॉलेजमध्ये महाराजांच्या काळात मुलींना फी माफ होती. शेतकऱ्यांच्या मुलांसाठीच्या शाळांच्या वेळा त्यांच्या सोयीने ठेवाव्यात, असे आदेश महाराजांनी दिले आहेत.

**वसतिगृहे:**

राजर्षी शाहू महाराजांनी वसतिगृहांच्या बाबतीत महाराष्ट्रातच नव्हे, तर संपूर्ण भारतात कोल्हापूरचे स्थान अद्वितीय ठरेल. अक्षरशः असंख्य वसतिगृहे कोल्हापुरात आहेत. यातली बहुतेक वसतिगृह शाहू महाराजांच्या काळातील आहेत. यातली अनेक वसतिगृहे जातवार आहेत. काही सर्व जातींचीही आहेत. वसतिगृहांवर भर आणि त्यासाठी खर्च म्हणजे ग्रामीण भागांतील विद्यार्थ्यांवर खर्च ही बाब स्पष्ट आहे. खेड्यातील मुलांना शहरात येऊन चांगले व वरचे शिक्षण घेता यावे म्हणून त्या-त्या समाजाला महाराजांनी प्रोत्साहन दिले. वसतिगृहांसाठी जागा दिल्या.

बहुतेक वसतिगृहांना कायम उत्पन्न मिळावे म्हणून शेती व इतर सोयी करून दिल्या.शाहू महाराजांनी एके ठिकाणी कोल्हापूरचा उल्लेख 'वसतिगृहाची जननी', असा केला आहे, तो रास्तच आहे. या वसतिगृहांनाच लाभ घेऊन संस्थानाबाहेरील आणि स्वातंत्र्यानंतरही दूरदूरचे विद्यार्थी कोल्हापुरात येऊन शिकले. ही वसतिगृहे नसती, तर जे शिकू शकले नसते.

**मागासलेल्या वर्गांची उन्नती:**

शाहू महाराजांनी मागासलेल्या वर्गाची आधी उन्नती झाली पाहिजे असा आग्रह धरला व त्या दिशेने कार्य करावयाला सुरुवात केली. ही भूमिका त्यांनी का स्वीकारली याचे कारण पूर्वेतिहासात तसेच तत्कालीन समाजस्थिती व पांढरपेशा नेत्यांच्या मनोवृत्तीत शोधावी लागते. १८९४ मध्ये शाहू महाराजांनी राजाचे अधिकार ग्रहण केले. शिक्षण, आर्थिक स्थिती, सांस्कृतिक पातळी, सामाजिक दर्जा या सर्वच बाबतीत बहुजन समाज मागासलेला होता. त्यांची उन्नती व्हावी असा उच्चवर्णीय नेतृत्वाचा प्रयत्न नव्हता. उलट पांढरपेशा वर्गाची सर्वच क्षेत्रात मिरासदारी राहावी असाच त्यांचा हेतू असल्याचे, महाराजांना जाणवत होते. उच्च शिक्षणाची ते काळजी घेत होते. सरकारने त्यावरच जास्तीत जास्त पैसा खर्च करावा असा त्यांचा आग्रह होता.मागासलेल्या जातीतील व्यक्तींसाठी पन्नास टक्के नोकऱ्या महाराजांनी राखून ठेवल्या होत्या, महाराजांनी वेदोक्त मंत्रांचा आग्रह धरला तर त्यांचा अहंकार दुखवला होता. त्यांना जीवनाच्या सर्वच क्षेत्रात आपले श्रेष्ठत्व अबाधित ठेवावयाचे होते व ते बहुजन समाजाच्या उन्नतीच्या आड येत होते, असेच महाराजांना जाणवले.

**सामाजिक समतेचा पुरस्कारता:**

अस्पृश्यासकट बहुजन समाजाच्या सर्वांगीण उद्धाराची तळमळ हाच महाराजांच्या सामाजिक दृष्टिकोनाचा गाभा आहे. राजर्षी शाहू छत्रपतींचा सामाजिक विचार द्वेषाधिष्ठित तर नव्हताच उलट प्रेमातून निर्माण झालेला होता. समतेचा पुरस्कार करणारा होता. वर्णश्रेष्ठत्वाने निर्माण केलेली विषमता त्यांना नष्ट करावयाची होती. उच्चवर्णीयांच्या अहंकाराने समाजाची कशी हानी झाली हे ते पाहत होते. समाजातील ५ टक्क्यांइतके लोक सर्व प्रकारचे फायदे उठवतात हे ते पाहत होते. ही विषमता दूर करणे म्हणजे वरच्यांना खाली ओढणे नव्हे तर खालच्यांना वर उचलणे म्हणून मागासलेल्या बहुजन समाजाला वर उचलून, त्याची सर्वांगीण उन्नती करण्याचा प्रयत्न धार्मिक, शैक्षणिक व आर्थिक बाबतीत होता.उच्चवर्णीयांच्या वर्चस्वाविरुद्ध जागृती करण्याचे व झगडण्याचे कार्य महात्मा जोतिबा फुले यांच्यानंतर राजर्षी शाहू महाराजांनीच महाराष्ट्रात केले. त्यांनी जातिकल्पनेवर व पर्यायाने जन्मजात वर्गरचनेला विरोध केला. आपल्या क्षेत्रीय व शूद्रांनी पूर्वीसारखीच धार्मिक जुलमाखाली मान वाकवावी हे शक्य नाही.सर्व जातीवर आपले धार्मिक व सामाजिक प्रभुत्व चालावे याकरिता राजकीय हक्क ही आपल्याच मिळावे या हेतूने प्रेरित झालेली एक

ब्युरॉक्रसी आहे व तिच्या सत्तेपासून मुक्त व्हावे व सर्वांना माणुसकीचे हक्क मिळावेत असे मानणारे राजर्षी शाहूमहाराज होते.

**धार्मिक सहिष्णूता:**

राजर्षी शाहूनां विशिष्ट जातीतील धार्मिक बाबतीतील मिरासदारी त्यांना नष्ट करावीशी वाटली. १९११ मध्ये कोल्हापुरात सत्यशोधक समाजाची शाखा स्थापन झाली. समाजाच्या पुरोहित शाळेस १९१३ मध्ये महाराजांनी अनुदान दिले. महाराजांनी १९१८ मध्ये आपल्या संस्थानात आंतरजातीय विवाहाचा कायदा मंजूर केला महाराजांनी वेगवेगळ्या जातीत सहकार्या निर्माण केले त्यांच्या सहकार्याने वसतिगृह काढली. त्यांना मोफत जमिनी दिल्या इमारती बांधण्यासाठी पैसे दिले मराठा जैन, लिंगायत, अस्पृश्य सारस्वत, देवश, शिपी, मुसलमान, बजारी यांची वसतिगृहे सुरू केली. तसेच इतर संस्थानाही अहमदनगर, पुणे इ. ठिकाणी विद्यार्थी वसतिगृह स्थापन करण्यास त्यांना प्रोत्साहन व साहाया दिले. बहुजन समाजातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थांची संख्या कितीतरी पटीने वाढली.

**शिक्षणातून आत्मउन्नती**:

राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या राज्यात सक्तीच्या शिक्षणाचा कायदा लागू केला. बहुजन समाजाने साक्षर होऊन, अथवा पुस्तकी ज्ञान मिळवून चालणार नाही बहुजन समाजाच्या उन्नतीवरच देशाची प्रगती अवलंबून असते. बहुजन समाज ज्ञानी व्हायला पाहिजे तसेच संपन्न व्हायला पाहिजे. उद्यमशील व्हायला पाहिजे, असे त्यांना वाटत होते. म्हणून त्यांनी शिक्षणाची व्यापक विचार होते. ते म्हणतात, आम्ही शेतकरी किंवा सैनिकच होऊन राहावे ही स्थिती आम्हाला समाधानकारक नाही म्हणून व्यापारधंदे व इतर उच्च प्रतीचे व्यवसाय यात आम्हास "शिरण्याची जरुरी आहे. हल्ली व्यापार व उदीम यात आम्ही पडतथ नाही. विसाव्या शतकात राष्ट्राची उन्नती व्यापार व तद्संबंधी चळवळ यावर अवलंबून आहे. शेतकी व्यवसायात अर्वाचीन युद्धपद्धतीत शिक्षणाची नितांत आवश्यकता असल्याचे त्यांनी विचारास कृतीतून आपल्या प्रजेस लागू केले, छत्रपती शाहू महाराजांचे वैशिष्ट्य असे की. अनुभवाने त्यांचे विचार बनत असत व विचार मनात आला की, ते कृतीत त्याचा पडताळा पाहत होते. म्हणून १९०६ मध्ये सुरू झालेल्या 'श्री शाहू छत्रपती स्पिनिंग अँड वीव्हिंग मिल' ला जागा दिली. भांडवलाची मदत केली. शिरोळ रोड येथील जिनिंग फॅक्टरीला मदत केली. उद्योगद्याची वाढ होण्याच्या दृष्टीने शाहूपुरी ही नगरी बसवून सोई उपलब्ध करून दिल्या. कोल्हापुरास व्यापारी जगात पत प्राप्त करून दिली.

**हरितक्रांतीची मुहूर्तमेढ:**

राजर्षी शाहू महाराजांनी शेती ही पारंपरिक पद्धतीने न करता आधुनिक पद्धतीने करावयास पाहिजे शेतकऱ्यांचे पावसाच्या पाण्यावरचे परावलंबित्व दूर करून शेती खात्रीची व्हावी, यासाठी लक्ष्मीबाई तलावाचे काम त्यांनी हाती

घेतले. इतरही वीस तलाव त्यांनी बांधले. शेतकरी वर्ग उद्योगी व सधन होण्यास मदत झाली. महाराष्ट्रात हरितक्रांतीची पहिली मुहूर्तमेढ श्री शाहू महाराजांनी रोवली. शेतकऱ्याची भरभराट व्हावयाची असेल तर प्रगत शेतीच्या जोडीला सहकारी चळवळीची जोड मिळणे आवश्यक आहे हे शाहूमहाराजांनी ओळखले म्हणून त्यांनी १९१२ मध्ये संस्थानात सहकारी कायदा मंजूर केला आणि सहकारी चळवळीस प्रेरणा दिली. शेतकऱ्यांच्या उन्नतीप्रमाणेच कामकऱ्यांच्या उन्नतीची तळमळ महाराजांना होती. १९१८ मध्ये मुंबईस परळ येथे भरलेल्या कामगारांच्या प्रचंड सभेत अध्यक्ष म्हणून भाषण करताना ते म्हणतात, 'आपल्या हिंदुस्थानातील स्थिती पाहू गेल्यास इकडे मुख्य मागासलेला वर्ग म्हणजे शेतकऱ्यांचा आहे व मीही त्यापैकीच एक आहे. शेतकरी कष्टकरी उपेक्षितवर्ग यांना सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करून देणे, त्याची आर्थिक उन्नती साधणे यासाठी महाराजांनी कार्य केले.

**विविध विद्या व कला जतन करणारा लोकराजा :**

राजर्षी शाहू महाराजांनी लोककल्याणकरी कार्य केले.त्यांनी अनेक विद्या कला यांना राज्याश्रय दिला.१८९७ साली मल्ल विद्याचे पुरुज्जीवन करण्याकरिता जुन्या राजवाड्याच्या परिसरात मोतीबाग तालमीची स्थापना करून आपल्या' पुत्र जन्मानिमित्त कुस्त्यांचे जंगी मैदान कोल्हापूरात आयोजित करून अनेक नामांकित मल्लना राज्याश्रय दिला. शाहू महाराजांचे शिकारीतील धाडस, चपळता हे विविध कौशल्य वाखाणण्याजोगे होते.१९९३ साली २२ व्या वर्षी वाघ अस्वल इ प्राण्याच्या शिकारी बरोबरच वन्यजीवाच्या संरक्षण व संवर्धन करण्याकरिता पश्चिमेकडील सह्याद्रीच्या रांगामधील जंगले अभयारण्ये राखीव ठेवण्यात आली.हत्तीच्या साठमारी चा आखाडे पिसाळलेल्या हत्तीनां काबूत आणण्यासाठी साहसी खेळ, त्याच बरोबर राजर्षी शाहू महाराजांनी चित्र कला, संगीत, नाट्य या कलांना राज्याश्रय दिला देवलक्लब या संगीत संस्थेची स्थापना १९९२ करण्यात आली महान संगीताचे गानमहर्षी अल्लादियाखा १९१६ मध्ये प्रतिभावंत कलावंत केशवराव भोसले यांचा सत्कार केला. आबालाल रहिमान दरबार चित्रकार म्हणून त्यांना तनखा राजर्षी महाराजांनी दिली.

**राजर्षी शाहूंचा सामाजिक न्याय :**

'सामाजिक न्याय' म्हणजे मानवा-मानवांमधील सामाजिक स्थितीच्या आधारावर कोणत्याही प्रकारचा भेदभाव होऊ न देणे, प्रत्येक व्यक्तीला आपल्या क्षमतेनुसार विकासाच्या समान संधी उपलब्ध असणे, कोणत्याही व्यक्तीचे कोणत्याही प्रकारचे शोषण होऊ न देणे, समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या किमान गरजा पूर्ण होईल, अशी व्यवस्था निर्माण करणे आणि समाजातील दर्बल वर्गालाही सुरक्षित वाटावे अशा वातावरणाची निर्मिती करण्याशी संबंधित आहे. महाराष्ट्र राज्य हे २६ जून हा दिवस 'सामाजिकन्याय दिन' म्हणून प्रत्येक वर्षी साजरा करते. महाराष्ट्रातच नव्हे तर

देशभरात 'सामजिक न्याया'च्या धोरणाबाबत आदर्शवत मानल्या गेलेल्या 'राजर्षी शाहू महाराज यांच्या जन्मदिनी' म्हणजेच '२६ जून हा दिवस 'सामाजिक न्याय दिन' म्हणून साजरा केला जातो.

२ एप्रिल १८९४ रोजी राजर्षी शाहू महाराज हे कोल्हापूरच्या गादीवर छत्रपती म्हणून स्थानापन्न झाले. शाहू महाराजांच्यापूर्वीजवळपास अर्धशतक कोल्हापूर संस्थानात अधिकार संपन्न राज्यकर्ता झाला नव्हता. ब्रिटीश वासाहतिक सत्तेद्वारे नियुक्त अभिजन व प्रस्थापित समाजातील कारभाऱ्यांच्या हाती सत्ता एकवटली होती. या काळातच संस्थानाच्या कारभारातील बहुजन समाजाचे प्रतिनिधित्व कमी कमी होत गेले होते. अभिजन समाजाच्या हाती सत्तासूत्रे आणि बहुजन समाजाचे नगण्य प्रतिनिधित्व यांच्या परिणामस्वरूप अठरा पगड जातीत विभागलेल्या बहुजन समाजाच्या विकासासाठी कोणतेही दिशादर्शक धोरण अस्तित्त्वात येऊ शकले नव्हते. मात्र, राजर्षी शाहू महाराजांच्या दीर्घकालीन कारकिर्दीत बहुजन समाजाचा मोठ्या प्रमाणात विकास झाला. शाहू महाराज यांच्या धोरणांमुळे बहुजन समाजाचे झालेले उत्थान, हे इतके प्रभावकारी होते की, शाहू महाराजांच्या धोरणांचे प्रतिबिंब हे आपणास भारताच्या संविधानात पहायला मिळते. वासाहतिक आधुनिकता आणि एतद्देशीय परंपरा यांच्यात होणाऱ्या परिवर्तणीय काळात शाहू महाराज हे कोल्हापूरच्या गादीवर आले. आधुनिकता आणि परंपरा यांच्यातील घुसळणीचा परिणाम छत्रपती शाहू महाराज यांच्या कारकिर्दीवर झालेला आपणास दिसून येतो. सांस्कृतिक बाबतीत जुन्या परंपरा, खेळ आणि कला यांचे पुनर्जीवन होऊन त्यांच्या वाढीस संस्थानाच्या माध्यमातून प्रोत्साहन मिळाले. दुसरीकडे सामाजिक संदर्भात आधुनिक मूल्यांवर भर देण्यात आल्यामुळे समाजसुधारणा, शिक्षण आणि मागासलेल्या बहुजन समाजाच्या प्रगतीसाठी संस्थानाचे विभिन्न प्रकारचे हस्तक्षेप दिसून येतात. शाहू महाराजांच्या कारकिर्दीत संस्थानाच्या माध्यमातून आधुनिक मूल्यांवर आधारित सामाजिक सुधारणा हे सामाजिक न्यायाच्या दृष्टीने महत्त्वाचा हस्तक्षेप ठरला. छत्रपती शाहू महाराज यांच्या कोल्हापूर संस्थानातील प्रजेमध्ये हिंदू धर्मीयांच्या सोबतच जैन, लिंगायत, मुस्लीम, ख्रिश्चन आणि पारशी धर्मीयांचा समावेश होता. सामाजिक सुधारणा आणि सामाजिक उत्थानाचे धोरण राबविताना शाहू महाराजांनी फक्त हिंदूधर्मीय प्रजेचाच विचार न करता सर्वधर्मीय प्रजेचा विचार केल्याचे दिसून येते. शाहू महाराजांनी ज्या प्रमाणे हिंदू धर्मात अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातींच्या कल्याणाकडे विशेष लक्ष दिले. अगदी त्याचप्रमाणे मुस्लीम समाज कल्याणाकडे शाहू महाराजांचे विशेष लक्ष होते, असे आपणास म्हणता येते.

**राजर्षी शाहू आणि राखीव जागांचा प्रश्न:**

राजर्षी शाहू महाराजांनी भारताची राज्यघटना अस्तित्वात येण्यापूर्वी ४८ वर्षे आणि आजपासून ९५ वर्षांपूर्वी २६ जुलै, १९०२ रोजी आपल्या संस्थानात ५० टक्के राखीव जागा ठेवल्या

होत्या. भारताची राज्यघटना १९५० साली अंमलात आली. त्यात मागास जातिजमातींसाठी राखीव जागांची तरतूद केली आहे. या राज्यघटनेत आर्थिकदृष्ट्या आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गासाठी राखीव जागांसंबंधी तरतूद करून ठेवली होती. भारताची राज्यघटना आणि राखीव जागांच्या या कालक्रमाच्या तुलनेत शाहूराजांचे कार्य ठळकपणे लक्षात घेतले पाहिजे. भारतातील राखीव जागा ठेवणारा हा बहुधा पहिलाच कायदा असावा. या हुकमात राजर्षी शाहू महाराजांनी असे म्हटले आहे की, संस्थानाच्या नोकरीत मागासवर्गीयांचे प्रमाण कमी आहे म्हणून ही परिस्थिती काही अंशी दूर करण्यासाठी व संस्थानामध्ये महाराजांच्या प्रजाजनांना उच्चशिक्षण संपादण्यास उत्तेजन देण्यासाठी या वर्गाकरिता आजपर्यंतच्या प्रमाणापेक्षा विस्तृत प्रमाणात संस्थानच्या नोकऱ्यांत जागा राखून ठेवण्याचा महाराजांचा कृतनिश्चय झाला आहे. सांगलीचे प्रसिद्ध वकील गणपतराव अभ्यंकर यांची व महाराजांची एकदा गाठ पडली असता ते महाराजांना म्हणाले, "महाराज, जात पाहून स्कॉलरशिप व नोकऱ्या देता, हे काही बरे नव्हे. लायकी पाहूनच त्या दिल्या पाहिजेत. " महाराजांनी त्या वेळी काहीच उत्तर दिले नाही. अभ्यंकर महाराजांच्या रथातच होते. त्यांनी आपला रथ घोड्यांच्या पागेकडे नेला. चंदी देण्याचीच ती वेळ होती. नोकरांना चंदी आणायला सांगितली. हरभरे एका जाजमावर टाकले. त्याबरोबर हरभरे खाण्यासाठी सर्व घोडी धावत आली. जी दांडगी, सशक्त होती, ती अशक्तांना मागे सारून पुढे घुसली. शिंगरे व म्हातारी मागे राहिली. त्यांना काहीच चंदी मिळाली नाही. हे अभ्यंकरांना दाखवून महाराज म्हणाले, "पाहिलंत अभ्यंकर, जी तल्लख, सशक्त आणि लायक होती त्यांनीच सर्व चंदी फस्त केली. लहान, रोगी व अशक्त उपाशीच राहिली. म्हणून मी चंदी तोबऱ्यात भरून त्यांना देतो. तसं चारलं नाही, तर त्यांना काहीच मिळणार नाही. मग मागसलेल्या व अस्पृश्य समजाला पुढे आणण्याकरिता खास सवलती नको का द्यायला? अभ्यंकरांना काहीच बोलता आले नाही. ते म्हणाले, "महाराज, तुमचं म्हणणं अगदी बरोबर आहे." अशा अनेक प्रसंगातून राजर्षी शाहू महाराजांची दूरदृष्टी दिसून येते.

**बहुजन समावेशनाचे राजकारण :**

राजर्षी शाहू महाराजांनी प्रत्यक्ष सरकारी सेवक पदी ही अस्पृश्यांच्या नेमणुका केल्या जाव्यात यासाठी ०५ ऑगस्ट १९१८ रोजी खास हुकूम काढला होता अस्पृश्य जातीच्या लोकांना बद्दल अलहिदा हुकूम देण्यात आलेला आहे सदर लोकांपैकी जे लोक आपले कर्तव्य कर्तबगारिने व सुबुद्धीने पुढे येतील त्यास भाग कारकून व अव्वल कारकून अशा प्रकारच्या जागा देण्यात याव्यात असा हुकूम काढला. या मधूनच महाराष्ट्रातील ग्रामीण भागात शाहू महाराजांनी निर्माण केलेले हे सामाजिक चित्र किती क्रांतिकारी दिसत असेल याची आपण आज कल्पना करू शकणार नाही. शाहू महाराजांनी अस्पृश्यांपैकी काहींच्या मुलखी खात्यात दप्तर बंद म्हणून तर काहींच्या पोलीस

खात्यात पोलीस म्हणून नेमणुका केल्या. १९२० पोलीस गेटवर १६ महारांची नेमणूक करताना महाराजांनी म्हटले आहे की, या लोकांचा समाजात दर्जा वाढवा म्हणून हे करीत आहोत. कोल्हापूर म्युनिसिपाल्टी चेअरमनपदी दादोबा पोवार नावाच्या एका अस्पृश्य व्यक्तीची नेमणूक करून बहुजनसमावेशनाचे राजकारण प्रत्यक्ष केले. अस्पृश्यतेच्या कल्पनेचीच त्यांना चीड होती. अस्पृश्य हा शब्द कोणाही माणसाला लावणे हे फार निद्य आहे असेच त्यांचे सांगणे होते. महाराजांनी अस्पृश्यता नष्ट करण्याच्या दृष्टीने स्वतःचे खासगी नोकर, माहूत इ. जागांवर अस्पृश्यांची नेमणूक करून इतरांना आदर्श घालून दिला. अस्पृश्यांना सरकारी नोकरीत अग्रक्रम दिला, अपवाद करून कमी शिकलेल्या अस्पृश्यांना समाजात प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त करून दिले. काही अस्पृश्य जातींना जन्मजात गुन्हेगार समजून पोलीस ठाण्यावरची सक्तीची हजेरी परंपरेने चालू होती. महाराजांनी ही हजेरीची माणुसकीला काळिमा आणणारी पद्धत बंद करून त्यांना माणुसकीचे हा निर्धाराने परत केले. कारखान्यात मजुरी करणारे आपण सर्व शेतकरीच आहोत तेव्हा सर्वांविषयी एकत्र विचार करणे सोयीचे आहे. मजूरदार व इतर मागासलेले यांच्या हिताचे संरक्षण करणे या हिंदुस्थान देशातही जरुरीचे आहे. पाश्चात्त्य देशात मजूरदार लोकांनी संघटना बळकट करून आपली स्थिती सुधारली आहे. एवढेच नव्हे तर आपल्या प्रतिनिधींचा प्रधान मंडळात समावेश करून घेतला आहे.अशाप्रकारे छत्रपती शाहू महाराजांनी ऐतिहासिक व क्रांतिकारक कार्य केले आहे.

**जातिभेद जातीय द्वेष, नष्ट करण्याकरिता राजर्षी शाहूंचे कार्य:**

राजर्षी शाहू महाराजांना जातिभेद नाहीसे व्हावेत म्हणून केलेले कार्य प्रसिद्ध आहे. कायदे करून आणि मागास जातीला सर्वतोपरी मदत करून महाराजांनी हे कार्य केले. आणि प्रत्यक्ष कृतीतून जनमानसात कार्याची प्रचिती दिली ती पुढीलप्रमाणे गंगाराम कांबळे या महार नागरिकास हॉटेल काढून दिले. ते स्वतः तिथे चहा पीत. कुणाचे काही काम असले की, तिथे बोलवत आणि स्वतःबरोबर गंगारामच्या हातचा चहा पाजत. शिकारीस असताना धनगराच्या घरात जेवत. एकदा एका हरिजन स्त्रीने जवळपास पाणी नाही म्हणून स्पृश्यांच्या विहिरीतून घागर भरून पाणी काढले. स्पृश्यांनी ते पाहिले. त्यांनी तिला तसेच महाराजांपुढे सोनतळीस नेले. तक्रार केली. महाराज त्या स्त्रीला रागारागाने बोलू लागले, आवाज चढला, घाईघाईने बोलू लागले. बोलता बोलता ठसका लागला. 'पाणी द्या! पाणी द्या!' म्हणून ओरडले आणि हरिजन स्त्रीच्या मडक्यातले पाणीच प्याले. पाणी प्याल्यावर म्हणाले, "अरे बाबांनो! आता मीच महारणीच्या घागरीतले पाणी प्यालो. काय करू ?" ठसका हे नाटक होते. महाराजांची ही कार्यपद्धती होती. महाराज तर्कांने पटविण्याऐवजी व्यवहाराने पटवीत. विचारांपेक्षा कृतीवर त्यांचा भर होता. जातिभेद पण महाराज नीट विचारही करीत, नीट मांडीत, ते १९२० ला एका व्याख्यानात म्हणाले, "जातिभेद

असू द्यात; पण जातिद्वेष मात्र नको, असे म्हणणारे पुष्कळ आहेत. हे मत प्रामाणिकपणाचे असल्यास त्यांच्या अज्ञानाची कीव केली पाहिजे. कारण, जातिभेदाचे कारण जातिद्वेष हे आहे. तेव्हा कार्य नाहीसे करण्यास कारणही काढून टाकले पाहिजे." किती तर्कशुद्ध मांडणी आहे ही! अर्थात, जातिभेद तीव्र होऊ नयेत याची दक्षता घेण्याची गरजही त्यांना मान्य होती. मागासांना सवलती व सोयी देताना त्याच्या परिणामी जातिभेद तीव्र होऊ नयेत, अशीच त्यांची भूमिका होती. राजर्षीच्या शाहू महाराजांच्या मते"मागासलेल्या जातीला वर आणण्याचे प्रयत्न झाले नाहीत, तर जातिभेदाचे कट्टर अभिमानी वीर तिला दडपून टाकल्याखेरीज राहणार नाहीत. यासाठी मागासलेल्यांचा कैवार घेणे हे जातिद्वेष वाढविणे नव्हे, हे उघड आहे." तथापि, ते असेही म्हणतात की, "सर्व जातीच्या पुढाऱ्यांना माझे सांगणे आहे की, आपली दृष्टी दूर ठेवा. पायापुरतेच पाहू नका. जातिभेद मांडणे इष्ट आहे. जरूर आहे. जातिभेद पाळणे हे पाप आहे. देशोन्नतीच्या मार्गात हा अडथळा आहे. हा दूर करण्याचे प्रयत्न जोराने केले पाहिजेत, ही जाणीव पक्की ध्यानात ठेवून मग त्या दिशेचा प्रयत्न म्हणून जाती परिषदा भरवा. परंतु, जातिबंधने दृढ करणे, जातिभेद तीव्र होणे, असा परिणाम अशा परिषदांतून होऊ नये, याची खबरदारी घेतली पाहिजे." मागासलेल्यांचा कैवार घ्या, त्यासाठी खास प्रयत्न करा. त्यांना सवलती द्या; परंतु अंतिम उद्दिष्ट जाती नाहीशा करणे हे आहे, याकडे दुर्लक्ष करू नका. जातिपरिषदा भरवून जातीच घट्ट होणार नाहीत, याची दक्षता घ्या. हा महाराजांचा सर्वकष विचार आजही उपयुक्त आहे.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शाहू महाराज** :

महार समाजातील एक तरुण परदेशातील इतक्या उच्च पदव्या प्राप्त करून मायदेशी आल्याचे समजता महाराजांना त्यांचा विलक्षण आनंद झाला एवढ्यावरच न थांबता त्यांनी मुंबई मुक्कामी डॉ. बाबासाहेब आंबेडकर च्या घरी जाऊन त्यांची भेट घेतली तसेच बहिष्कृत समाजात जागृती करण्यासाठी व त्याच्यावर अन्यायास वाचा फोडण्यासाठी मूकनायक या वृत्तपत्र सुरू केले बाबासाहेबांचे उपक्रमामध्ये शाहू महाराजांनी आपले अर्थसहाय्य उभे केले तसेच अस्पृश्य समाजाच्या मानगावच्या परिषदेपासून म्हणजेच मार्च १९२० रोजीच्या परिषदेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या रूपाने अस्पृश्य समाजास एक नेतृत्व मिळालं यांचा महाराजांना मोठा आनंद झाला तुम्ही तुमचा खरा पुढारी शोधून काढला याबद्दल मी तुमचे मन:पूर्वक अभिनंदन करतो असेही त्यांनी माणगावच्या परिषदेला उद्देशून सांगितले

**सारांश :**

सद्यकालीन लोकशाही व्यवस्थेमध्ये तळागाळातल्यांच्या शिक्षणाबद्दल कमकुवत झालेली शिक्षणव्यवस्था आणि राजर्षी शाहूराजांच्या विचारांचे शिक्षणविषयक धोरण मार्गदर्शक ठरणारे आहे.राजर्षी शाहू महाराजांचे सर्वसमावेशक

सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाच्या कायद्यामुळे झालेला बदल, आजच्या संदर्भातसुद्धा त्यांच्या विचारांची प्रस्तुतता महत्त्वाची आहे. राजर्षी शाहू महाराज वसाहतवादी व्यवस्थेत निर्माण झालेल्या जातिग्रस्त सरंजामशाही विरुद्ध त्यांनी संघर्ष केला आणि लोकशाही विकासाचे नवे विकासक्रम जन्मास घातले. समाजातील मागासवर्गात आपल्या अधिकारांबाबत जागृती निर्माण केली. स्त्रियांना आज सार्वजनिक अवकाशाबाहेर पडायची संधी मिळाली.

**संदर्भ ग्रंथ :**


१) पवार जयसिंगराव, (२०१६) राजर्षी शाहू जीवन व कार्य महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर.

२) कणबरकर रा. कृ. (२०१९), ग्लिम्सेस ऑफ राजर्षी शाहू महाराज, शिवाजी विद्यापीठ प्रकाशन,

३) कीर धनंजय (१९७६) शाहू छत्रपती : अ रॉयल रेव्होल्यूशनरी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई-

४) जाधव रमेश (संपादक) (२०१६), राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई.

५) पाटील भारती ,(२०२२), ‘छत्रपती शाहू महाराज आणि स्त्री उन्नती’ शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर